॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

* **सुविचार** *
प्राप्तीपेक्षा प्रयत्नाचा आनंद मोठा असतो

■ अहिल्यानगर ■ शुक्रवार, दि. २९ मे २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ६ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

## SPOT NEWS

### नव्या सरन्यायाधीशांच्या नियुक्तीसाठी ५ नावांची शिफारस

**● नवी दिल्ली –** सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश नियुक्त करण्यासाठी पाच नावांची शिफारस केंद्र सरकारकडे पाठवली आहे. यामध्ये चार उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायाधीश आणि एक वरिष्ठ महिला वकील यांचा समावेश आहे. कॉलेजियमने पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश शील नागू, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश श्री चंद्रशेखर, मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश संजीव सचदेवा, जम्मू-काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश अरुण पल्ली आणि वरिष्ठ वकील व्ही मोहना यांची नावे पाठवली आहेत. ही शिफारस २२ आणि २७ मे रोजी झालेल्या कॉलेजियमच्या बैठकांमध्ये करण्यात आली आहे. ज्येष्ठ वकील व्ही. मोहना यांच्या नियुक्तीमुळे सर्वोच्च न्यायालयात महिलांचा सहभाग मजबूत होण्याची अपेक्षा आहे. सध्या सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना या एकमेव महिला न्यायाधीश आहेत. ऑगस्ट २०२१ नंतर कोणत्याही महिलेची सर्वोच्च न्यायालयात नियुक्ती झालेली नाही. सध्या सर्वोच्च न्यायालयात ३२ न्यायाधीश आहेत. जूनमध्ये न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती पंकज मित्तल यांच्या निवृत्तीनंतर आणखी दोन पदे रिक्त होतील.

### देशात पुढील ३ दिवस पावसाचा अलर्ट

**● मुंबई –** देशातील १५ हून अधिक राज्यांमध्ये शुक्रवारपासून उष्णतेपासून दिलासा मिळणार आहे. राजस्थान, मध्यप्रदेश, बिहार, यूपीमध्ये पुढील तीन दिवस पाऊस पडू शकतो. बिहारमधील ३२ जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. ६० किमी प्रतितास वेगाने वारे वाहू शकतात. तर, राजस्थानमध्ये जयपूरसह ११ जिल्ह्यांमध्ये वादळी वा-यासह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. जैसलमेर, फलोदी, गंगानगर, बिकानेरमध्ये काल उष्णतेच्या लाटेचा सर्वाधिक परिणाम दिसून आला. बुधवारी राजस्थानमधील श्रीगंगानगर हे देशातील सर्वात उष्ण शहर ठरले, येथे तापमान ४८ अंशाच्या पुढे जाऊन ४८.२ अंशापर्यंत पोहोचले. महाराष्ट्रातील नागपूरमध्ये गेल्या तीन दिवसांत रेल्वे स्टेशन, रस्ते, उड्डाणपुलाखाली आणि इतर सार्वजनिक ठिकाणी १६ लोकांचे मृतदेह आढळले. उष्णतेच्या लाटेमुळे या लोकांचा मृत्यू झाल्याची प्रशासनाला भीती आहे. नागपूरमध्ये बुधवारीही कमाल तापमान ४६ अंश होते. पहाडी राज्यांबद्दल बोलायचे झाल्यास, आज उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशात पाऊस आणि गारपीट होऊ शकते.

# शनिवारपासून उन्हात आंदोलन करणार

## मनोज जरांगे । मराठा आरक्षणासाठी पुन्हा आंदोलनाचा इशारा

**● जालना । वीरभूमी –** मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी येत्या ३० मे पासून अंतरवाली सराटीत रखरखत्या उन्हात आमरण उपोषण करणार असल्याचे जाहीर केले आहे. सरकारला गेल्या १० महिन्यांपासून वेळ दिला होता, त्या काळात सातारा गॅझेटिअरवर जीआर काढला गेला नाही असे जरांगे यांनी म्हटले. उन्हात आमरण उपोषणाला बसणार असून मेलो तरी चालेल असे मनोज जरांगे म्हणाले. मला चर्चा नकोय, आरक्षणाची अंमलबजावणी पाहिजे असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे.



मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी सरकारला १० महिने वेळ दिल्याचे सांगितले. माझा नाइलाज आहे, मला कोणाला दोष द्यायचा नाही, आपल्या लेकराला, समाजाला मिळत नसेल तर आपण कठोर भूमिका घेणे गरजेचे आहे. मी सीमारेषेवर आलेलो आहे, ३० मे चे आमरण उपोषण ठरवले आहे, त्यात बदल केला आहे. आमरण उपोषण सावलीत, मंडपात, फॅनमध्ये आपण ते करत होतो, सगळे तसेच करतात. मला अंतिम टोकाचे आणि कठोर आमरण उपोषण करायचे आहे, रखरखत्या उन्हात हे उपोषण बाज टाकून करणार आहे. ना कुठले पाणी, ना कुठले जेवण, ना पायात चप्पल घालणार असे मनोज जरांगे म्हणाले.

माझ्या शरीरात प्रचंड वेदना आहेत, जे काही होईल ते होईल, उष्माघाताचा बळी गेला तर देवेंद्र फडणवीसांमुळे गेला, सरकारमुळे गेला. कितीही जीवाची लाही लाही झाली तरी हरकत नाही, कारण माझ्या समाजाच्या लेकरांच्या आयुष्याचा उन्हाळा झाला, तर आपण आपली कदर का करायची असे मनोज जरांगे म्हणाले. आमरण उपोषण कुठेही होईल, जंगलात होईल, रानात होईल, कडक उन्हात ते उपोषण होईल यावर मी ठाम आहे. किती वेदना होतील याचा विचार करायचा नाही हे ठरवलं आहे. सारखी सारखी उपोषणं करून जीवाला वेदना होत आहेत. एकदा तुकडा पडू देत, सरकारचा तुकडा पडेल किंवा माझा तुकडा पडेल. हे आंदोलन सुरू आहे त्याला तीन वर्षे झाली आहेत. मे महिन्याच्या कडक रखरखत्या उन्हात हे आमरण उपोषण होणार आहे असे मनोज जरांगे यांनी म्हटले.

कुणबी मराठा मंत्रालय स्थापन करायला वेळ का लागतोय?

माझ्या समाजाच्या लेकराचा उन्हाळा होतोय, ते कुठेतरी थांबले पाहिजे. आमरण उपोषण फायनल झाले आहे, यात बदल होणार नाही. मराठा समाजाने अंतरवाली सराटीकडे येऊ नये, असेही मनोज जरांगे यांनी आवाहन केले आहे. देशात इतके टोकाचे आमरण उपोषण झाले असेल असे वाटत नाही, असेही जरांगे यांनी म्हटले. प्रसाद लाड, राधाकृष्ण विखे पाटील येणार की नाही हे मला माहिती नाही. २९ ऑगस्टपासून उद्यापर्यंत १० महिन्यांचा वेळ दिला आहे.

# ओबीसी आरक्षणाला धक्का लावल्यास गाठ आमच्याशी : लक्ष्मण हाके

**● पुणे । वीरभूमी –** ओबीसी आरक्षणाला धक्का लावल्यास गाठ आमच्याशी असेल, असा इशारा ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी दिला आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या आंदोलनावर टीका करताना हाके यांनी हे आंदोलन म्हणजे लोकशाही आणि आरक्षणाचे अज्ञान असल्याचे म्हटले.



हाके म्हणाले की, मनोज जरांगे यांचे आंदोलन म्हणजे लोकशाही आणि आरक्षणाचे कवडीचेही ज्ञान नसलेल्या माणसाच्या हातात गेलेला पोरखेळ आहे. सरकारने त्यांच्यासाठी नेहमीच रेड कार्पेट घातले असून त्यांच्या दबावाखाली येऊन काढलेले सरकारी नोटिफिकेशन पूर्णपणे बेकायदेशीर आहे.

जरांगे यांच्या नवव्या उपोषणावर बोलताना हाके यांनी त्यांना उपरोधिक सदिच्छा दिल्या. ते म्हणाले, याआधी ८ वेळा उपोषण झाले आहे, आता हे नववे उपोषण सुरू आहे. पाच पिढ्यांचे नुकसान झाल्याचा दावा जरांगे करत आहेत, पण मग यामुळे फायदा नेमका कुणाचा झाला? मुळात मराठा समाजातील गरिबीला ओबीसी आरक्षण कसे काय जबाबदार असू शकते? त्यांनी जरांगे पाटलांना बजेटमध्ये ओबीसींसाठी किती निधी येतो, याचे आत्मपरीक्षण करण्यास सांगितले. पुढाऱ्यांनी आणि सहकारमहर्षींनीच संपत्तीचे केंद्रीकरण करून मराठा समाजाची फसवणूक केल्याचा आरोपही त्यांनी केला.

शासनाच्या धोरणांवर प्रहार करताना हाके म्हणाले की, सरकारने जरांगे यांचे अवाजवी लाड पुरवले आहेत. मुख्यमंत्री आणि मंत्री केवळ त्यांनाच भेटायला जातात, पण त्यांना ओबीसी समाजाचे दुःख आणि भूमिका का कळत नाही? सरकार कोणताही निकष न लावता बेकायदेशीरपणे प्रमाणपत्रे वाटत असून, सर्व कुणबी प्रमाणपत्रे बनावट असल्याचा दावा त्यांनी केला. या आंदोलनामुळे ओबीसींचे मोठे नुकसान झाले असून, आमचे अस्तित्वच धोक्यात आले आहे, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली.

# कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्यांचा राजीनामा; डीके होणार नवे सीएम

**● बंगळूरू । वीरभूमी –** कर्नाटकच्या या हायव्होल्टेज राजकीय नाट्याचा अखेर क्लायमॅक्स समोर आला असून, मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी अखेर आपल्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्याची अधिकृत घोषणा करीत राजीनामा दिला आहे. आपल्या निवासस्थानी आयोजित केलेल्या ब्रेकफास्ट मीटिंग दरम्यान त्यांनी भावूक वातावरणात हा मोठा निर्णय मंत्र्यांसमोर जाहीर केला. या घोषणेसोबतच कर्नाटकातील काँग्रेस सरकारमध्ये आता मोठ्या नेतृत्वबदलावर शिक्कामोर्तब झाले असून कर्नाटकचे नवे मुख्यमंत्री म्हणून डीके शिवकुमार शपथ घेतील.

आज सकाळी ९ वाजता मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी ही बैठक सुरू होणार होती, मात्र ती एक तास उशिराने म्हणजेच १० वाजता सुरू झाली. मुख्यमंत्री सिद्धरामय्या स्वतः एक तास उशिराने डायनिंग टेबलपाशी पोहोचले, जिथे सर्व मंत्री त्यांची वाट पाहत होते. अत्यंत भावनिक वातावरणात सिद्धरामय्या यांनी आपण पद सोडत असल्याचे जाहीर केले, ज्यामुळे बैठकीत काही काळ शांतता पसरली होती.

दिल्लीहून परतलेले उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार विमानतळावरून थेट सिद्धरामय्या यांच्या शासकीय निवासस्थानी दाखल झाले. यावेळी कर्नाटक काँग्रेसमध्ये कोणताही वाद नसल्याचा संदेश देण्यासाठी दोन्ही नेत्यांनी एकमेकांना घट्ट मिठी (गळाभेट) मारली. इतकेच नाही तर, डी. के. शिवकुमार यांनी सिद्धरामय्या यांच्या पाया पडून त्यांचे आशीर्वाद घेतले. या दृश्यामुळे कर्नाटकात आता डी. के. शिवकुमार यांच्याच राज्याभिषेकाची तयारी पूर्ण झाल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

सिद्धरामय्या यांच्या घरी मंत्र्यांसाठी खास दाक्षिणात्य बेत आखण्यात आला होता. मेन्यूमध्ये मऊ इडली, गरमागरम वडा आणि खमंग मसाला डोसा होता. यासोबतच पोंगल, उप्पित (उपीट), केसरीबाथ, सागू, सांभर आणि चटणीचा आस्वाद मंत्र्यांनी घेतला. मात्र, या चवदार भोजनासोबतच राजकारणाचा मसाला अधिक कडू-गोड ठरला.

# राष्ट्रवादीत अर्थमंत्रालय सांभाळण्याच्या पात्रतेचे कोणी नाही

**● मुंबई । वीरभूमी –** अजित पवार यांच्या निधनानंतर अर्थखाते सांभाळणारा कोणताही नेता सध्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नसल्याची जाणीव असल्याने यासंदर्भात कोणतीही हालचाल सुरू झालेली नाही. दिलीप वळसे-पाटील वगळता अर्थ खात्याचा आवाका असलेला नेता सध्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे नाही. त्यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे अर्थव्यवहार आणि या खात्यातील घडामोडी, दैनंदिन व्यवहार झेपण्याची शक्यता नसल्याने सध्या हे खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच सांभाळावे लागेल. याची राष्ट्रवादी काँग्रेसमधील बहुतेक सर्वांना कल्पना आहे.

उपमुख्यमंत्रिपद सांभाळण्यात सुनेत्रा पवार उत्तमप्रकारे मेहनत घेत आहेत. त्यांच्याकडे असलेले अबकारी कर (एक्साईज) हे खातेही मोठे असल्याने त्यांनी लगेचच अर्थखाते मिळावे अशाप्रकारची कोणतीही मागणी उघड किंवा आडून केली नसल्याचे माहीतगार सूत्रांनी सांगितले. येत्या काही महिन्यांत सरकारचा कारभार सहका-यांकडून समजून घेणे आणि पक्षकार्यात लक्ष घालण्यावर सुनेत्रा पवार लक्ष देतील, असे निकटच्या मंडळींनी सांगितले. येत्या काही महिन्यांत त्यांनी पक्ष आणि कारभारावर पकड मिळवली की, त्यांना अधिक मोठे खाते देण्यावर विचार होऊ शकेल. यासंदर्भात स्वतः देवेंद्र फडणवीस काही उपाययोजना प्रत्यक्षात आणण्याची शक्यता आहे. युतीत तीन सहकारी पक्ष असताना निधीचे वितरण ही मोठी समस्या असते. प्रत्येक पक्षाचे समाधान करत आमदारांना त्यांच्या मतदारसंघाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देणे ही जबाबदारी मुख्यमंत्री फडणवीस पेलू शकतात. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना तसेच अजित पवार असतानाही अर्थ खात्याच्या सर्व फायली फडणवीस यांच्या माध्यमातून समोर जात असत, असेही एका ज्येष्ठ नेत्याने लक्षात आणून दिले.

सध्या राष्ट्रवादी काँग्रेसला अर्थ खाते देणे शक्य नाही; पण निदान महसूल, ऊर्जा-ग्रामविकास असे एखादे दमदार खाते दिले जावे, ही मागणी समोर केली जाणार आहे.

# बकरी ईदच्या दिवशी मुस्लिम युवकांकडून गोशाळेत चारा वाटप

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** बकरी ईद (ईद-उल-अजहा) या पवित्र सणानिमित्त शहरात धार्मिक एकात्मता, सामाजिक सलोखा आणि मानवतेचा अनोखा संदेश देणारा उपक्रम गुरुवारी (दि. २८ मे) पार पडला. मुस्लिम समाजातील युवकांनी ईदच्या नमाजनंतर थेट गोशाळेत जाऊन गाईंना चारा वाटप करत समाजासमोर बंधुभावाचे एक वेगळे उदाहरण उभे केले. या उपक्रमामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या असून, धर्म वेगळे असले तरी माणुसकी एकच असते, हा संदेश देण्यात आला.

कुष्ठधाम रोड, बारस्कर मळा येथील सतनाम साक्षी गोशाळेत आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशनच्या वतीने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. ईदच्या आनंदात सहभागी होत मुस्लिम युवकांनी गोमातेला चारा अर्पण करून धार्मिक एकात्मतेची भावना जपली. यावेळी फाऊंडेशनचे अध्यक्ष साहेबान जहागीरदार, मौलाना शफिक कासमी, नगरसेवक हाजी शैबाज, शैबाज बॉक्सर, शहानवाज शेख, फिरोज पठाण, फिरोज आर्किटेक, तनवीर तांबोळी, आयान शेख, मुजम्मिल शेख, शाहिद मोमीन, जीशान शेख, साहिल सय्यद यांच्यासह गोशाळेचे सचिव सीए शंकर अंदानी, मुकेश माधवाणी आणि अनेक युवक उपस्थित होते.

ईदसारख्या धार्मिक सणाच्या दिवशी मुस्लिम समाजातील युवक गोशाळेत चारा घेऊन पोहोचल्याने उपस्थितांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले. समाजात अनेकदा अफवा आणि गैरसमजांच्या माध्यमातून धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत असताना, या उपक्रमाने मात्र हिंदू-मुस्लिम ऐक्याचे जिवंत उदाहरण समोर आणले. भारत हा कृषीप्रधान देश असून गाईला येथे विशेष धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक महत्त्व आहे. याच पार्श्वभूमीवर गाईला 'राष्ट्रीय पशू' घोषित करण्यात यावे, अशी मागणी मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने नुकतीच जिल्हा प्रशासनाकडे केली होती. त्या मागणीला अधिक बळ देण्यासाठी ईदच्या दिवशी गोशाळेत चारा वाटप करण्यात आले.



मौलाना शफिक कासमी यांनीही ईदच्या दिवशी पार पडलेल्या या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, इस्लाम धर्म मानवतेचा, दयाळूपणाचा आणि सहअस्तित्वाचा संदेश देतो. समाजात शांतता आणि बंधुभाव टिकवणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे शहरात धार्मिक सलोखा आणि सामाजिक ऐक्याचा सकारात्मक संदेश पोहोचला असून, अनेक नागरिकांनी या पुढाकाराचे स्वागत केले आहे.

# SPOT NEWS

## एमडी आयुर्वेद परीक्षेत डॉ. पूजा भागवत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

**● शेवगाव । वीरभूमी–**

नाशिक येथील महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठांतर्गत



येणाऱ्या प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या शेवगाव येथील आयुर्वेद महाविद्यालयाची विद्यार्थिनी डॉ. पूजा हेमंत भागवत यांनी एमडी आयुर्वेद परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. डॉ. पूजा भागवत या शेवगाव येथील सामाजिक कार्यकर्ते व गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर फुलचंद रोकडे यांच्या कन्या असून, कुकाणा (ता. नेवासा) येथील डॉ. हेमंत भागवत यांच्या पत्नी आहेत. जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर त्यांनी हे घवघवीत यश मिळवले. त्यांना प्राचार्य डॉ. संतोष पवळे, माजी प्राचार्य डॉ. बी. टी. शिंदे तसेच डॉ. प्रसाद पांडे, डॉ. श्रीकांत दारोकर, डॉ. अंकुश खेडकर आणि डॉ. पल्लवी घनवट यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र विखे पाटील, सहसचिव सौ. मोनिका सावंत, विश्वस्त ध्रुव विखे पाटील, कार्यकारी संचालक पंजाबराव आहेर पाटील आदींसह विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## शिवसैनिकांना जाणीवपूर्वक अडकविण्याचा कट?; शिष्टमंडळाचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे यांचे नाव वापरून खोटा बनाव रचत गुन्ह्यात अडकविण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप शिवसेनेच्या वतीने करण्यात आला आहे. शहरात शिवसैनिकांना जाणीवपूर्वक लक्ष्य करून त्यांच्यावर दबाव आणण्याचे प्रकार वाढत असल्याचा आरोप करत शिवसेनेच्या शिष्टमंडळाने मंगळवारी (दि. २६ मे) जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांची भेट घेत निवेदन दिले. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका यांनी संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती तपासली जाईल तसेच विनाकारण कोणालाही त्रास दिला जाणार नाही, असे आश्वासन दिले. यावेळी शिवसेनेचे शहरप्रमुख संभाजी कदम, जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले, दिलीप सातपुते, विक्रम राठोड, नगरसेवक दत्तात्रय कावरे, अभिषेक भोसले आदी उपस्थित होते. योगेश चंद्रकांत गलांडे हे सावेडी गाव येथील संघर्ष चौक परिसरात वास्तव्यास असून नवनागापूर येथे त्यांचे कार्यालय आहे. ते स्वराज्य कामगार संघटनेचे सचिव तसेच युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. कामगारांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवून कंपन्या व कामगार यांच्यात समन्वय साधण्याचे काम ते करत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. गलांडे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, एमआयडीसी परिसरात कंत्राटदार म्हणून काम करणारा चिरंजीव दत्तात्रय गाढवे हा विविध कंपन्यांतील अधिकारी व सुपरवायझर यांना धमकावून त्रास देत असून, त्याच्यावर खंडणी व धमकावण्याचे गुन्हे दाखल आहेत. दि. २७ डिसेंबर २०२५ रोजी सनफार्मा चौकात गाढवे याने गाडी आडवी घालत रिव्हॉल्व्हरचा धाक दाखवून कोयत्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप गलांडे यांनी केला असून त्याबाबत एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा क्रमांक ९५८/२०२५ दाखल करण्यात आल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यानंतर गाढवे याने न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान दबाव टाकण्याचा प्रयत्न केल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

### नगर शहरातील नगर-मनमाड रोडवर

# मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसायावर छापा

**चार जणांविरोधात गुन्हा दाखल । तोफखाना पोलिसांची दमदार कारवाई**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

शहरातील नगर-मनमाड रोडलगत असलेल्या क्यूम मसाज पार्लर/ स्पा सेंटरवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने मध्यरात्री छापा टाकून देहविक्रीचा प्रकार उघडकीस आणला. या कारवाईत चार महिलांची सुटका करण्यात आली असून स्पा सेंटरचा मालक, मॅनेजर, मदतनीस आणि एका ग्राहकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई दि. २७ मे रोजी रात्री उशिरा करण्यात आली.



अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली ही धडक कारवाई पार पडली. गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार नगर-मनमाड रोडवरील साई मिडास इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर सुरू असलेल्या क्यूम स्पा सेंटरमध्ये महिलांना मसाज सेंटरच्या नावाखाली बोलावून देहविक्रीस भाग पाडले जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

यानंतर पोलिसांनी पंचांसमक्ष बनावट ग्राहक पाठवून सापळा रचला. बनावट ग्राहकाकडे ५०० रुपयांच्या आठ नोटा देण्यात आल्या होत्या. ग्राहकाने स्पा सेंटरमध्ये जाऊन शरीर संबंधासाठी महिलेची मागणी केल्यानंतर पोलिसांना खात्री पटली आणि रात्री सुमारे ११.३५ वाजता पोलिस पथकाने स्पा सेंटरवर छापा टाकला.

कारवाई दरम्यान स्पा सेंटरमध्ये दोन कर्मचारी आढळून आले. त्यांची नावे अनिकेत अशोक बचाटे (रा. करमाळा, जि. सोलापूर) व काळुराम भिमा समिंदर (रा. शिरूर, जि. पुणे) अशी आहेत. चौकशीत स्पा सेंटरचा मालक संतोष गणेश बघे (रा. संभाजीनगर) असल्याचे समोर आले. पोलिसांनी केलेल्या झडतीत रोख रक्कम, बनावट ग्राहकाकडून देण्यात आलेल्या नोटा, चार मोबाईल हँडसेट, इतर साहित्य असा एकूण ६० हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. स्पा सेंटरमधील वेगवेगळ्या रूमची तपासणी केली असता एका खोलीत बनावट ग्राहकासोबत महिला आढळून आली. तसेच दुसऱ्या खोलीत एक ग्राहक आणि महिला मिळून आले. आणखी दोन महिला स्टाफ रूममध्ये आढळून आल्या.

चौकशीत संबंधित महिलानी स्पा सेंटरच्या नावाखाली त्यांच्याकडून देहविक्री करून घेत असल्याची माहिती पोलिसांना दिली. या कारवाईत चार महिलांची सुटका करण्यात आली असून आरोपींकडून महिलांना पैशांचे आमिष दाखवून देहविक्रीस भाग पाडले जात असल्याचे निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणी संतोष गणेश बघे, अनिकेत अशोक बचाटे, काळुराम भिमा समिंदर आणि ग्राहक सजन एस. यांच्याविरोधात विविध कलमान्वये तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाईदरम्यान तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ, पोउपनिरीक्षक तुषार धाकराव, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे कर्मचारी, होमगार्ड तसेच पंच उपस्थित होते.

## 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार' प्राप्त संगीता मालकर यांचा गौरव

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागातर्फे सन २०२४-२५ या वर्षासाठी प्रदान करण्यात आलेला जिल्हास्तरीय 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार' प्राप्त झाल्याबद्दल सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संगीता मालकर यांचा आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने शहर बँकेचे व्हाइस चेअरमन तथा श्री विशाल गणपती मंदिराचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते यांनी सत्कार केला.

या सत्कार समारंभाप्रसंगी आंतरराष्ट्रीय खेळाडू आप्पासाहेब दूस, शिवाजी घाडगे, कारभारी गरड, चंद्रकांत सोनार यांच्यासह सामाजिक, शैक्षणिक व बँकिंग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी संगीता मालकर यांना श्री विशाल गणेशाची प्रतिमा, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रा. माणिक विधाते म्हणाले की, संगीता मालकर या महिला सक्षमीकरणासाठी निस्वार्थ भावनेने काम करत आहे. केवळ शिक्षिका म्हणून नव्हे, तर समाजातील वंचित, गरजू आणि एकल महिलांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करणाऱ्या कार्यकर्त्या म्हणून स्वतः ची ओळख निर्माण केली आहे. 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार' हा केवळ पुरस्कार नसून समाजसेवा, स्त्री सक्षमीकरण आणि लोकहितासाठी झटणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा सन्मान आहे. हा पुरस्कार संगीता मालकर यांना मिळणे म्हणजे त्यांच्या अनेक वर्षांच्या समर्पित कार्याची पावती आहे. त्यांनी शिक्षक गुणगौरव पुरस्कारातून मिळालेली मोठी रक्कम गरजू महिलांसाठी शिवणयंत्रे खरेदी करून खर्च केली. ही बाब त्यांच्या संवेदनशीलतेचे आणि समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचे प्रतीक आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक महिलांना नवे आयुष्य मिळाले असून अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

त्या सावित्रीबाई फुले ज्ञानदीप प्रतिष्ठानच्या अध्यक्षा असून 'साऊ एकल महिला समिती महाराष्ट्र राज्य'च्या तालुका समन्वयक म्हणूनही कार्यरत आहेत.

## महाराष्ट्र नवनिर्माण सेना पाथर्डी तालुका पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर

**● पाथर्डी । वीरभूमी–**



पाथर्डी तालुक्यातील मनसे पदाधिकारी नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या असून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या आदेशान्वये व संपर्क अध्यक्ष नयन कदम यांच्या सूचनेनुसार उपजिल्हाध्यक्षपदी मोहरी येथील देविदास हंडाळ, उपतालुकाध्यक्षपदी सोमठाणे येथील रामेश्वर काकडे, आल्हणवाडी येथील विनोद गव्हाणे, शिरसाटवाडी येथील एकनाथ सानप यांची निवड मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी नियुक्तीपत्र देत केली.

मनसेची नुकतीच पाथर्डी येथील शासकीय विश्रामगृहावर बैठक पार पडली यावेळी तालुक्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संघटन बळकट करून आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत निवडणुका लढवण्यासाठी तयारीला लागण्याच्या सूचना मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी दिल्या. तालुक्यात विरोधी पक्षच उरला नसून सत्ताधाऱ्यांचा मनमानी कारभार सुरू आहे परंतु मनसे सक्षम पर्याय म्हणून जनतेसमोर उभा राहणार असून येत्या काळात ग्रामपंचायती पासून सर्व निवडणुका संघटना बांधणी करून लढणार असल्याचा निर्धार पालवे यांनी व्यक्त केला.

तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ यांनी सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांचे पक्षात स्वागत करत जोमाने काम करा जिथे मदत लागेल तिथे जिल्हाध्यक्ष व मी नेहमी आपल्या सोबत असल्याचा विश्वास व्यक्त केला पक्ष बांधणीसाठी लवकरच गाव तिथे शाखा उपक्रम राबवणार असल्याचेही तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ यांनी म्हटले.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे काम जोमाने करणार असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला.

या बैठकीस मनसे तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ, शेतकरी सेना तालुकाध्यक्ष अंबादास शेळके, महिला सेना तालुकाध्यक्ष रेणुका फुलशेटे, शहराध्यक्ष संदीप काकडे, विद्यार्थी सेनेचे प्रवीण शिरसाट, विशाल भापकर यांसह मोठ्या संख्येने महाराष्ट्र सैनिक हजर होते.

# पंधरा लाखांच्या नऊ तोळे सोन्याच्या दागिन्यांची प्रामाणिकपणे परतफेड

**जी एस महानगर बँकेतील कर्मचारी राजेश वराळ यांच्या प्रामाणिकपणाचा चेअरमन गीतांजली शेळके यांच्या हस्ते सत्कार**

**● पारनेर । वीरभूमी–**

जी एस महानगर बँकेच्या शिरूर शाखेतील ग्राहक छाया बाळासाहेब शेळके यांचे बँकेत राहिलेले नऊ तोळे सोन्याचे दागिने प्रामाणिकपणे परत केल्याबद्दल बँकेतील कर्मचारी राजेश रामचंद्र वराळ यांचा बँकेच्या चेअरमन गीतांजली शेळके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, छाया बाळासाहेब शेळके या नेहमीप्रमाणे जी एस महानगर बँकेच्या शिरूर शाखेत लॉकरची पाहणी करण्यासाठी आल्या होत्या. लॉकर ऑपरेट केल्यानंतर त्यांचे नऊ तोळे सोन्याचे दागिने नकळत खाली पडले. त्यानंतर त्या लॉकर बंद करून निघून गेल्या.

दरम्यान, राजेश वराळ हे कामानिमित्त लॉकर रूममध्ये गेले असता त्यांना हे दागिने खाली पडलेले दिसले. त्यांनी तत्काळ ते दागिने शाखाधिकारी बाबाजी लामखडे यांच्या निदर्शनास आणून दिले. नुकत्याच छाया शेळके या लॉकर रूममध्ये गेल्याचे लक्षात आल्याने लामखडे यांनी तातडीने त्यांना पुन्हा बँकेत बोलावून लॉकरची तपासणी करण्यास सांगितले. तपासणीदरम्यान दागिने हरवल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर लामखडे यांनी ते दागिने त्यांना दाखवले.

याच वेळी बँकेच्या चेअरमन गीतांजली शेळके या शाखेला भेट देण्यासाठी आल्या होत्या. त्यांच्या हस्ते हे दागिने छाया शेळके यांना सुपूर्द करण्यात आले.

यावेळी चेअरमन गीतांजली शेळके म्हणाल्या, जी एस महानगर बँकेचे अधिकारी व कर्मचारी अत्यंत परिश्रमपूर्वक आणि प्रामाणिकपणे सेवा देत असल्यामुळे बँकेचा नावलौकिक देशभरात झाला आहे. राज्यातील शाखांमध्ये ठेवी, कर्जवाटप आणि वसुलीमध्ये जी एस महानगर बँकेचे नाव सहकार क्षेत्रात अग्रक्रमाने घेतले जाते. यामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान आहे.

त्या पुढे म्हणाल्या, शिरूर शाखेचा नावलौकिक पुणे जिल्ह्यात आहे. शाखाधिकारी बाबाजी लामखडे, राजेश वराळ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रामाणिकपणे काम केल्यामुळे शाखेचा मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. वराळ यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

छाया शेळके म्हणाल्या, लॉकरची पाहणी करताना दागिने खाली पडल्याचे आमच्या लक्षात आले नाही. मात्र राजेश वराळ यांनी अत्यंत प्रामाणिकपणे हे दागिने शाखाधिकारी लामखडे यांच्याकडे सुपूर्द केले. चेअरमन गीतांजली शेळके यांच्या हस्ते दागिने परत मिळाल्याने समाधान वाटले. जी एस महानगर बँकेच्या प्रत्येक शाखेतील सेवा आणि प्रामाणिकपणा ग्राहकांना आकर्षित करतो.

शाखाधिकारी बाबाजी लामखडे म्हणाले, गेली २५ ते ३० वर्षे राजेश वराळ यांनी ग्राहकसेवा करताना प्रामाणिकपणे काम केले आहे. जी एस महानगर बँकेचे संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके आणि माजी चेअरमन उदयदादा शेळके यांनी दिलेली शिस्त, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव आम्ही सर्वांनी जपला आहे.



ते पुढे म्हणाले, चेअरमन गीतांजली शेळके, उपाध्यक्ष भास्करराव कवाद आणि संचालक मंडळ यांच्या नेतृत्वाखाली ग्राहक सेवा आणि बँकेचा नावलौकिक वाढवण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत आहोत. वराळ यांचा प्रामाणिकपणा हा समाजासाठी आदर्श आहे.

जी एस महानगर बँकेतील अधिकारी राजेश वराळ यांनी गेली २५ ते ३० वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावत बँकेचा नावलौकिक वाढवला आहे. सध्याच्या बाजारभावानुसार सुमारे पंधरा ते साडेपंधरा लाख रुपये किंमतीचे नऊ तोळे सोन्याचे दागिने प्रामाणिकपणे परत करून त्यांनी समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या प्रामाणिकपणाबद्दल सोशल मीडियातून तसेच विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

SPOT NEWS

## शांतता व राष्ट्रीय एकात्मतेसाठी प्रार्थना करत बकरी ईद उत्साहात साजरी

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

शहरासह जिल्ह्यात मुस्लिम समाज बांधवांनी बकरी ईद (ईद उल अज्हा) गुरुवारी (दि.२८ मे) मोठ्या उत्साहात साजरी केली. शहरातील ईदगाह मैदान येथे सकाळी ९:३० वाजता ईदची नमाज मौलाना नदिम अख्तर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी शहरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. नमाजच्या प्रारंभी धार्मिक व्याख्यान, नमाजनंतर खुदबा व त्यानंतर मुस्लिम बांधवांनी सामुदायिक नमाज अदा केली. देशात शांतता, समृध्दी व राष्ट्रीय एकात्मतेसाठी प्रार्थना करण्यात आली. सकाळी ७ वाजल्यापासून शहरातील विविध मशिदी मधून बकरी ईदची नमाज अदा करण्यात आली. ईदनिमित्त प्रमुख नमाज पठण कोठला येथील ईदगाह मैदानात झाले. मुस्लिम बांधवांनी एकमेकांच्या भेटी-गाठी घेऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या. तर कुर्बानी करताना इतर धर्मियांना त्रास होणार नाही आणि गोवंश जनावरांची कुर्बानी न करण्याच्या समाजबांधवांना विशेष सूचना करण्यात आल्या. पोलीस प्रशासनाच्या वतीने खबरदारी म्हणून ईदगाह मैदानसह शहरातील चौका-चौकात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कोठला येथून जाणारी वाहतूक दुसऱ्या मार्गाने वळविण्यात आली होती. नमाजनंतर शहरातील विविध कब्रस्तान व दर्गामध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. बकरी ईद निमित्त तीन दिवस म्हणजे गुरुवार पासून शनिवार पर्यंत घरोघरी कुर्बानी केली जाणार आहे. सोशल मीडियावर देखील बकरी ईदच्या शुभेच्छांचा पाऊस पडला होता.

# 'काळुबाईची बाधा' घालवण्याच्या बहाण्याने फसवणूक

### साडेसहा लाख लुबाडत महिलेवर लैंगिक अत्याचार । पारनेरमध्ये धक्कादायक प्रकार उघड

**● पारनेर । वीरभूमी -**

मतिमंद मुलाचा आजार बरा करण्याचे आणि भावाचे लग्न जमवून देण्याचे आमिष दाखवून एका कुटुंबाची साडेसहा लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार पारनेरमध्ये उघडकीस आला आहे. एवढेच नव्हे तर, मुलाला जिवंत मारण्याची धमकी देऊन भोंदूबाबाने पीडित महिलेवर वारंवार जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केल्याची चटका लावणारी घटना समोर आली आहे. याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात मुख्य भोंदू बाबा, त्याचा मुलगा आणि महिला साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पारनेर येथील पठारे मळा परिसरातील रहिवासी असलेल्या ४० वर्षीय पीडित शेतकरी महिलेचा १७ वर्षांचा मुलगा अनिकेत हा मतिमंद आहे. वैद्यकीय उपचार करूनही त्याच्यात सुधारणा होत नव्हती, तसेच शेतीत पिके येऊनही घरातील कर्ज फिटत नव्हते. याच दरम्यान पीडितेचा भाऊ बाळासाहेब रेपाळे याचेही वय होऊनही लग्न जमत नव्हते. कौटुंबिक अडचणींनी खचलेल्या या महिलेला रुई छत्रपती (ता. पारनेर) येथील राजू बन्सी दिवटे, त्याचा मुलगा शशिकांत राजू दिवटे आणि त्यांची महिला सहकारी शोभा अविनाश तरटे (रा. म्हसणे, पारनेर) हे देवऋषी (देवभगत) असून ते अडचणींवर तोडगा काढतात, अशी माहिती मिळाली होती.

त्यानंतर पीडितेने २०२० पासून या भोंदूबाबाकडे जाण्यास सुरुवात केली. त्यावेळी संशयित भोंदूबाबाने, तुमच्या कुटुंबाला




मांढरदेवीच्या काळुबाईची बाधा आहे, त्यासाठी होमहवन व पूजा करावी लागेल, असे सांगितले. मुलाच्या उपचारासाठी ३ ते ४ लाख आणि भावाच्या लग्नासाठी दीड लाख रुपये खर्च येईल, असे सांगून त्यांनी पीडितेकडून मुलाचे व भावाचे फोटो तंत्र-मंत्र करण्यासाठी मागवून घेतले.

सुरुवातीला पूजा साहित्याच्या नावाखाली शोभा तरटे हिने १० हजार रुपये घेतले. त्यानंतर पारनेर येथील मुख्य बाजारपेठेतील चौधरी कॉम्प्लेक्समधील घरात काळुबाईच्या फोटोसमोर होमहवन करून पीडितेला अंगारा व तीर्थ पिण्यास दिले. जानेवारी २०२५ ते मार्च २०२६ दरम्यान पीडितेने गायत्री कॉम्प्युटर्स, पारनेर यांच्यामाध्यमातून २ लाख ५६ हजार ६८४ रुपये ऑनलाईन आणि एप्रिल २०२६ मध्ये २ लाख रुपये रोख, असे एकूण ४ लाख ५६ हजार रुपयांहून अधिक रक्कम राजू दिवटे याला दिली. तसेच भावाच्या विवाहासाठी एकूण १ लाख ९३ हजार ५३० रुपये ऑनलाईन व रोख स्वरूपात उकळले. ही सर्व रक्कम पीडितेने 'येस बँक फायनान्स'कडून कर्ज काढून दिली होती. पैसे उकळल्यानंतरही मुलाच्या तब्येतीत फरक पडला नाही. यादरम्यान आरोपी राजू दिवटे हा पीडितेला मांढरदेव येथे पूजेसाठी चारचाकी गाडीतून नेत असताना त्याने गाडीत अश्लील वर्तन केले. त्यानंतर चौधरी कॉम्प्लेक्समधील फ्लॅटवर मुलाच्या उत्तम आयुष्यासाठी माझ्यासोबत शरीरसंबंध ठेवावे लागतील, नाहीतर तुझ्या मुलाच्या फोटोचे तुकडे करून काळुबाईच्या कोपाने त्याला मारून टाकीन, अशी धमकी दिली. मुलाच्या जिवाच्या भीतीने पीडितेने होकार दिला. संशयित राजू दिवटे याने पीडितेला गुंगीचे किंवा रंगीत पाणी पाजून जानेवारी २०२५ ते १ मार्च २०२६ दरम्यान तब्बल ८ ते १० वेळा तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केला. काहीही फरक न पडल्याने जेव्हा पीडितेने आणि तिच्या भावाने आपले पैसे परत मागितले, तेव्हा आरोपींनी दोघांनाही शिवीगाळ करत बेदम मारहाण केली. कुठेही तक्रार केली तर समाजात बदनाम करीन, सासरी नांदू देणार नाही, अशी धमकी पीडितेला दिली, तर भावाला एका रात्रीत तडफडून मारून टाकीन अशी तांत्रिक धमकी दिली.

भीतीच्या छायेत असलेल्या पीडितेने अखेर आपल्या सासू-सासऱ्यांना हा सर्व प्रकार सांगितला. त्यांनी धीर दिल्यानंतर पीडितेने पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा आणि जादूटोणा प्रतिबंधक कायद्यासह बलात्कार, फसवणूक आणि मारहाणीचा गुन्हा दाखल केला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

# पारनेर शहरातील महामार्गाच्या कामाला गती द्या

### रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**● पारनेर । वीरभूमी-**

पारनेर शहरातून जात असलेल्या महामार्गाचे काम संथ गतीने सुरू असल्यामुळे नागरिक आणि विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे संबंधित विभागाने रस्त्याच्या कामाला गती देऊन पुढील दोन महिन्यांत हे काम पूर्ण करावे, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय)च्या वतीने करण्यात आली आहे.

आरपीआयचे युवक तालुकाध्यक्ष प्रदीप संपतराव नगरे यांनी राज्याचे महसूल व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना यासंदर्भात लेखी निवेदन दिले आहे.

पालकमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात प्रदीप नगरे यांनी पारनेर शहरातील वाहतूक व्यवस्था आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. पारनेर शहरातील



ग्रामीण रुग्णालय, सुपा रोड आणि पानोली चौक या दरम्यानच्या महामार्गाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. पारनेर बसस्थानकापासून शाळा व महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची या मार्गावर नेहमी मोठी वर्दळ असते. शाळा आणि महाविद्यालये सुरू व सुटण्याच्या वेळेत परिसरात मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते.

शाळा सुरू असताना हे काम रखडल्यास वाहतूक कोंडी वाढून अपघातांची शक्यता निर्माण होऊ शकते, अशी भीती निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे.

सध्या शाळा व महाविद्यालयांना उन्हाळी सुट्ट्या असल्यामुळे विद्यार्थ्यांची वर्दळ कमी आहे. हीच संधी साधून ग्रामीण रुग्णालय, सुपा रोड आणि पानोली चौक परिसरातील रस्त्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात यावे. पुढील दोन महिन्यांत हे काम पूर्ण होण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला आवश्यक त्या सूचना द्याव्यात, अशी मागणी आरपीआयच्या वतीने करण्यात आली आहे.

देवीभोयरे फाटा, पारनेर, हंगा, सुपा, वाळवणे आणि खडकी या मार्गावरील रस्त्याचे काम 'हुडको'च्या आर्थिक सहाय्यातून सध्या प्रगतीपथावर आहे. याच प्रकल्पाचा भाग असलेल्या पारनेर शहरातील ग्रामीण रुग्णालय, सुपा रोड आणि पानोली चौक परिसरातील कामाला लवकरात लवकर गती देऊन ते पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना संबंधित ठेकेदाराला देण्यात आल्याची माहिती अहिल्यानगर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी दिली आहे.

# संतांची भगवंताकडेच भगवंताच्या चरण सेवेची मागणी : शिवाजी महाराज भालूरकर

**● कोपरगाव । वीरभूमी-**

साधुसंतांचा भगवंताकडे मागण्याचा अधिकार असतानाही त्यांनी सुख ,मोक्ष व इतर काही न मागता फक्त भगवंताची चरण सेवा करण्याची मागणी केली आहे असे प्रतिपादन हभप शिवाजी महाराज भालूरकर यांनी केले आहे.

तालुक्यातील रामवाडी येथे संत तुकाराम महाराज गाथा पारायण व किर्तन महोत्सवाचे सातवे पुष्प गुंफताना ते बोलत होते. कीर्तनात त्यांनी सांगितले की, अभंगातून भक्ताची देवाप्रती असलेली संपूर्ण शरणागती आणि प्रेमभावना प्रकट होते. वंदीन चरण या शब्दांतून नम्रता, तर डोळ्यांनी पाहीन रूप तुझे या ओळीतून भक्ताची ईश्वरदर्शनाची उत्कट इच्छा स्पष्ट होते.

पुढे विवेचन करताना ते म्हणाले की, भक्ती ही केवळ मंदिरापुरती मर्यादित नसून ती जीवनशैली आहे. देवावर नितांत श्रद्धा ठेवून प्रत्येक कर्म केले, तर



जीवनात समाधान आणि मानसिक शांतता लाभते. देवाशी नाते हे व्यवहाराचे नसून प्रेमाचे आणि विश्वासाचे असावे, असा संदेश संत नामदेव महाराजांनी दिला आहे.

महाराज म्हणतात की मला पंढरीचा वास दे कारण पंढरपुरात राहून मी लोटांगण घालून तुझ्या चरणाला वंदन करेल. तुझे रूप डोळ्यांनी भरभरून पाहत आनंदाने पूजन करील. मला कोणतेही सुख शांती व इतर काही न देता मला फक्त तुझी सेवा करण्याकरता तुझ्या चरणाजवळ जागा द्यावी अशी मागणी पांडुरंगाकडे केली आहे.

यावेळी अरुण म. पगारे, दिनकर म.मोईन, संदीप म. वैद्य, ह भ प भाकरे महाराज, कृष्णा म. लकारे, सुनील महाराज, धोंडीराम तपकीरे, वाल्मीक महाराज, पावडे महाराज आदींनी संगीत साथ केली तर संचालक दिलीप बोरनारे, सरपंच विवेक परजणे, शिवाजी महाराज ठाकरे आदीसह परिसरातील भाविक उपस्थित होते.

# स्वाभिमानी गणेश परिसराकडून विवेक कोल्हेंचा जंगी नागरी सत्कार

### 'घायल होता हूँ तो घातक होता हूँ' आमदार विवेक कोल्हे यांची धुरंधर टोलेबाजी

**● कोपरगाव । वीरभूमी-**

श्री गणेश परिसराच्यावतीने आमदार विवेक कोल्हे यांचा नागरी सत्कार विरभद्र महाराज मैदान राहता येथे संपन्न झाला. यावेळी सर्वपक्षीय नेतेमंडळींनी सत्कार व शुभेच्छा देण्यासाठी लावलेली हजेरी उल्लेखनीय ठरली.युवानेते विवेक कोल्हे यांची लोकप्रियता आणि त्यांच्या राहता येथील भूमिकेला ऐकण्यासाठी हजारो नागरिकांनी उस्फुर्त गर्दी केली होती.

आ. विवेक कोल्हे यांनी सत्काराला उत्तर देताना आपली रेष मोठी करण्याचे सकारात्मक राजकारण करण्यात मला रस आहे. गणेश परिसराने स्व.शंकरराव कोल्हे यांच्यासारखे गुण माझ्यात असल्याची जाणीव करून दिली त्यानंतर क्रांती घडली.अतिशय कष्टातून आपण गणेश कारखाना सुरळीत करण्याचा प्रयत्न केला.ऊसाला सर्वोच्च भाव देऊन १७७ कोटी रुपये पर्यंत रक्कम शेतकरी जीवनात आर्थिक चक्र फिरवण्यात वितरित झाली.१४ कोटीपर्यंत जुनी देणी देत कर्मचाऱ्यांना दिलासा दिला. आम्ही कुणाचाही व्यक्तिद्वेष करत नाही फक्त संस्थाहित जपले पाहिजे हा एकमेव आग्रह आहे.

पूर्वी सत्ताधारी पक्षात होतो पण सत्तेत नव्हतो आता सत्तेत देखील आहे. आपण शिक्षक मतदारसंघात निवडणूक लढवली मात्र त्यात जे घडले ते आज समाधान आहे कारण तसे झाले नसते तर कदाचित अमित शाह यांच्याशी भेट झाली नसती.आता आपल्याल केवळ पाच जिल्ह्यापुरते नाही तर संपुर्ण महाराष्ट्र कार्यक्षेत्र मिळाले आहे त्यात राहता आणि लोणी देखील येते असे विधान करताच एकच जल्लोष झाला.

एक हक्काचा व्यक्ती आमदार म्हणून आहे त्यामुळे अर्ध्या रात्री तुमच्यासाठी उभा असेल. तुमच्याप्रती असणारी जबाबदारीची मला जाणीव आहे. पश्चिमेचे पाणी पूर्वेकडे वळवणे, विजेचे प्रश्न, निळवंडेचे पोटचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नवत राहू.अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आपण हॉटलाइन आहोत त्यामुळे आपली कामे अडणार नाहीत यासाठी विशेष लक्ष देऊ असा विश्वास कोल्हे यांनी दिला.

श्री गणेश कारखाना ताब्यात आला तेव्हा आपल्याला अडचणींचा सामना करावा लागला. त्यातून मार्ग काढून आपण कारखाना सुरळीत करण्यासाठी काम केले. अनेक अडथळे आणण्याचा गणेश विरोधक प्रयत्न करत आहेत त्यांना विनंती असेल आपण लोकशाही मार्गाने सभासदांना निवडणुकीत कौल मागा मात्र असे आर्थिक त्रास देण्याचे राजकारण करू नका. या कामधेनुला विनाकारण त्रास दिला तर गणेश विरोधकांना एकच सांगेल, 'घायल होता हू तब घातक होता हुं' असे म्हणत सूचक संदेश देखील दिला.

यावेळी कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानी गणेशचे माजी संचालक रामचंद्र बोठे हे होते. कॉंग्रेस नेत्या प्रभावतीकाकी घोगरे, ज्येष्ठ नेते गंगाधर चौधरी, ॲड. शिवाजी कोते, शिवाजी तात्या लहारे, भाजपा नेते राजेंद्र पिपाडा, गणेशचे अध्यक्ष सुधीर लहारे, उपाध्यक्ष विजय दंडवते, विराट पुरोहित, शिवसेना (उबाठा) चे सोमनाथ गोरे, शिवाजीराव गोंदकर, ॲड. नारायणराव कार्ले, भाऊसाहेब चौधरी, सचिन तांबे, सुरेश थोरात, नगरसेवक शशिकांत लोळगे, सचिन चौघुले, राजेंद्र अग्रवाल, आप्पासाहेब दंडवते, गणेश सोमवंशी, विजय मोगले, भाऊसाहेब थेटे, संजयराव सोमवंशी, वसंतराव चोळके, चंद्रभान गुंजाळ, विलासराव टिळेकर, वसंतराव गायकवाड, उत्तमराव घोरपडे, गणपतराव धरम, सुरेशराव गमे, नानासाहेब शेळके, संजय शेळके, संजयराव सरोदे, चंद्रभान धनवटे, शंकरराव जेजुरकर, सुरेश थोरात, धनंजय गाडेकर, अनिल बोठे, सिमोन जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# श्रीगोंदा तालुक्यात बकरी ईद उत्साहात साजरी

## ईदगाह मैदानावर सामुदायिक नमाज | शांतता व राष्ट्रीय एकात्मतेसाठी विशेष प्रार्थना



**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
शहरासह श्रीगोंदा तालुक्यात मुस्लिम समाजबांधवांनी बकरी ईद (ईद-उल-अजहा) गुरुवारी मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरी केली. शहरातील आनंदकर मळा परिसरातील ईदगाह मैदानावर सकाळी ८.३० वाजता सामुदायिक नमाज अदा करण्यात आली. मौलाना जैनुद्दीन आत्तार यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज पठण करण्यात आले.

ईदगाह मैदानावर शहरासह तालुक्यातील हजारो मुस्लिम बांधव अबालवृद्धांसह मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांची सामुदायिक नमाज संत श्री शेख महंमद महाराज मंदिर येथे संपन्न झाली.

नमाजपूर्वी धार्मिक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर खुदबा व सामुदायिक नमाज अदा करण्यात आली. देशात शांतता, समृद्धी आणि राष्ट्रीय एकात्मता नांदावी यासाठी विशेष प्रार्थना करण्यात आली. सकाळी ७ वाजल्यापासून शहरातील विविध मशिदींमध्येही बकरी ईदची नमाज अदा करण्यात आली.

ईदनिमित्त मुस्लिम बांधवांनी एकमेकांच्या भेटीगाठी घेत शुभेच्छांची देवाणघेवाण केली. तसेच कुर्बानी करताना इतर धर्मीयांना कोणताही त्रास होणार नाही, याची काळजी घेण्याबाबत आणि गोवंशीय जनावरांची कुर्बानी न करण्याबाबत समाजबांधवांना विशेष सूचना देण्यात आल्या.

पोलीस प्रशासनाच्या वतीने खबरदारीचा उपाय म्हणून पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ईदगाह मैदानासह शहर आणि तालुक्यात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

नमाजानंतर संत श्री शेख महंमद महाराज मंदिर येथे दर्शनासाठी मुस्लिम बांधवांनी मोठी गर्दी केली. दरम्यान, बकरी ईदनिमित्त सोशल मीडियावरही शुभेच्छांचा वर्षाव होत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# निघोज परिसरात एकमेकांना शुभेच्छा देत बकरी ईद उत्साहात साजरी



**● निघोज । वीरभूमी–**
पारनेर तालुक्यातील निघोज व परिसरात मुस्लिम समाज बांधवांनी बकरी ईदचा सण उत्साहपूर्ण वातावरणात साजरा केला. यावेळी परिसरातील ईदगाह मैदानावर सकाळी १० वाजता मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने एकत्र आले होते. त्यांनी सामूहिक नमाज पठण करून देशात शांतता, सौहार्द आणि बंधुभाव नांदावा यासाठी प्रार्थना केली.

नमाज पठणानंतर समाज बांधवांनी एकमेकांना बकरी ईदच्या शुभेच्छा देत आनंद व्यक्त केला. निघोज व परिसरात हिंदू-मुस्लिम समाजातील नागरिक सर्व सण उत्साहाने आणि एकोप्याने साजरे करीत असल्याचे यावेळी पाहायला मिळाले.

यावेळी हिंदू समाज बांधवांनीही मुस्लिम बांधवांना बकरी ईदच्या शुभेच्छा देत सामाजिक सलोखा आणि बंधुभाव जपण्याचा संदेश दिला.

# कोपरगाव राष्ट्रवादी काँग्रेसकडून मुस्लिम बांधवांना बकरी ईदच्या शुभेच्छा

**● कोपरगाव । वीरभूमी–**
शहरात दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी ‘बकरी ईद’चा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व मुस्लीम बांधवांनी ईदगाह मैदान व अक्सा मस्जिद येथे सामुदायिक नमाज पठण केले. याप्रसंगी कोपरगाव राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी आमदार आशुतोष काळे यांच्या वतीने सर्व मुस्लीम बांधवांना ‘बकरी ईद’ च्या शुभेच्छा दिल्या.



कोपरगाव शहरात बकरी ईदचा सण अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. ईदनिमित्त नमाज पठण करण्यासाठी ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांचा जनसागर उसळला होता. नमाज संपन्न झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी या ठिकाणी उपस्थित राहून सर्व मुस्लिम बांधवांची गळाभेट घेत त्यांना आमदार आशुतोष काळे यांच्या वतीने ईदच्या शुभेच्छा दिल्या. सामाजिक बांधिलकी जपतांना राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी या सणाचा आनंद मुस्लिम बांधवांसोबत द्विगुणित केल्याने कोपरगावात बंधुता, शांतता व एकोप्याचे दर्शन घडले.

याप्रसंगी नगरसेवक हाजी मेहमूद सय्यद, इम्तियाज अत्तार, माजी नगरसेवक अजीज शेख, फकीरमामु कुरेशी, नवाज कुरेशी, जावेद शेख, जुनेद शेख, हारुण शेख, मोहसीन सय्यद, नगरसेवक शैलेश साबळे, सोमनाथ आढाव, बाळासाहेब रुईकर, माजी नगरसेवक रमेश गवळी, दिनकर खरे, सचिन परदेशी, चंद्रकांत धोत्रे, सुनिल फंड, गणेश बोरुडे, संतोष दळवी आदींसह मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पारनेर तालुक्यात बकरी ईद मोठ्या उत्साहात साजरी

## ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज पठण | शांतता व बंधुभावासाठी विशेष प्रार्थना

**● पारनेर । वीरभूमी–**
देशभरात गुरुवारी मुस्लिम बांधवांचा पवित्र सण ‘बकरी ईद’ (ईद-उल-अजहा) उत्साहपूर्ण आणि धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. त्याच पार्श्वभूमीवर पारनेर तालुक्यातही आनंद, उत्साह आणि सामाजिक सलोख्याचे वातावरण पाहायला मिळाले.

पारनेर शहरासह सुपा, निघोज, टाकळी ढोकेश्वर, अळकुटी, दरोडी, पिंपळगाव रोठा, भाळवणी तसेच ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये बकरी ईद मोठ्या उत्साहात आणि शांततेत साजरी करण्यात आली.



पारनेर शहरातील मुख्य ईदगाह मैदानावर गुरुवारी सकाळी मुस्लिम बांधव पारंपरिक पोशाखात मोठ्या संख्येने एकत्र आले होते. यावेळी सामूहिक नमाज पठण करण्यात आले. नमाजनंतर देशात शांतता, समृद्धी आणि बंधुभाव टिकून राहावा यासाठी विशेष दुआ करण्यात आली. त्यानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना गळाभेट देत ईदच्या शुभेच्छा दिल्या. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

या पवित्र सणाचे औचित्य साधून ईदगाह मैदानावर संत साहित्याचे अभ्यासक डॉ. आर. जी. सय्यद उपस्थित होते. त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सामाजिक सलोखा आणि एकोप्याचा संदेश दिला.

बकरी ईद हा सण त्याग, समर्पण आणि मानवी मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश देतो. समाजात शांतता आणि एकोपा टिकवून ठेवणे ही सर्वांची जबाबदारी आहे. संतांच्या भूमीत राहणाऱ्या आपण सर्वांनी त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत सामाजिक सलोखा अधिक मजबूत केला पाहिजे, असे आवाहन डॉ. सय्यद यांनी केले.

ग्रामीण भागातही सकाळपासूनच सणाचा उत्साह दिसून येत होता. तालुक्यात कुठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. एकूणच, पारनेर तालुक्यातील बकरी ईदचा सण सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि ऐक्य अधिक दृढ करणारा ठरला.

# श्री देवी अंबिका ट्रस्टला ‘ब’ वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा मिळणार

## मंत्री जयकुमार गोरे यांचा सकारात्मक प्रतिसाद; आमदार काशिनाथ दाते यांच्या पाठपुराव्याला यशाची आशा

**● निघोज । वीरभूमी–**
पारनेर तालुक्यातील देवीभोयरे येथील श्री देवी अंबिका ट्रस्टला ‘ब’ वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा मिळावा यासाठी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला असून, या प्रयत्नांना आता यश मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. संबंधित प्रस्ताव मंजुरीच्या अंतिम टप्प्यात पोहोचला असून यासंदर्भात आमदार काशिनाथ दाते, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत तसेच देवीभोयरे गावच्या शिष्टमंडळाने ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांची मुंबई येथे भेट घेतली.



यावेळी आमदार दाते यांनी देवीभोयरे येथील श्री देवी अंबिका देवस्थान हे संपूर्ण देशातील गोसावी समाजाचे प्रमुख श्रद्धास्थान असल्याचे सांगितले. वर्षभरात लाखो भाविक दर्शनासाठी येथे येत असतात. मात्र सध्या ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा असल्याने निधीच्या मर्यादा येत असून भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे या देवस्थानास ‘ब’ वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा देणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी मंत्री गोरे यांच्या निदर्शनास आणून दिले.

मतदारसंघातील धार्मिक, सामाजिक आणि विकासात्मक प्रश्नांबाबत सातत्याने संवेदनशील भूमिका घेत आमदार काशिनाथ दाते कार्यरत असल्याचे या पाठपुराव्यातून पुन्हा स्पष्ट झाले आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसोबतच धार्मिक स्थळांच्या विकासासाठी शासन दरबारी प्रभावीपणे आवाज उठवत आवश्यक निधी आणि सुविधा मिळवून देण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत.

देवीभोयरेसारख्या श्रद्धास्थानाचा विकास झाल्यास भाविकांना अधिक सुविधा उपलब्ध होतील, स्थानिक रोजगाराला चालना मिळेल तसेच परिसराच्या विकासालाही गती मिळेल, ही भूमिका त्यांनी सातत्याने मांडली आहे.

सदर मागणीवर मंत्री जयकुमार गोरे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्याबाबत आश्वासन दिले. त्यामुळे देवीभोयरे गावासह संपूर्ण भाविकवर्गामध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून लवकरच श्री देवी अंबिका ट्रस्टला ‘ब’ वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यावेळी अंबिका माता ट्रस्टचे अध्यक्ष शिवाजीराव जाधव, विश्वनाथ गाजरे गुरुजी, माजी उपसरपंच विकास सावंत, सामाजिक कार्यकर्ते बाबुराव मुळे, श्रीराम पतसंस्थेचे व्हाइस चेअरमन गोपीचंद बेलोटे, माजी उपसरपंच दत्तात्रय दौलत बेलोटे, सुभाष बेलोटे, बाबुराव एकनाथ बेलोटे, अक्षय राजाराम बेलोटे, भाऊसाहेब पोपट सरडे, कमलाकर लहू बेलोटे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

> सध्या अंबिका देवी ट्रस्टला ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा असल्यामुळे विकास निधी मिळविण्यात अनेक अडचणी येत आहेत. त्यामुळे ट्रस्टचे पदाधिकारी, विश्वस्त मंडळ आणि ग्रामस्थांनी आमदार काशिनाथ दाते तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत यांच्याकडे देवस्थानास ‘ब’ वर्ग दर्जा मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला होता. आमदार दाते आणि अशोक सावंत यांनी तातडीने मंत्री जयकुमार गोरे यांच्याशी संपर्क साधून ट्रस्ट पदाधिकारी आणि मंत्री महोदय यांची बैठक आयोजित केली. मंत्री गोरे यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला असून, आमदार दाते आणि अशोक सावंत यांच्या प्रयत्नांतून लवकरच ‘ब’ वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.
>
> – **शिवाजीराव जाधव**, अध्यक्ष, अंबिका देवस्थान ट्रस्ट, देवीभोयरे